# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# पाटण तालुक्यात स्वातंत्र्यदिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा

▲ **पाटण,** दि. १७ : भारतीय स्वातंत्र्यदिन तालुक्यात विविध देशभक्तिपर कार्यक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. येथील तहसील कार्यालयात प्रांताधिकारी सोपान टोम्पे यांनी व प्रांत कार्यालयात तहसीलदार अनंत गुरव यांनी ध्वजारोहण केले.

यावेळी नायब तहसीलदार अमित कदम, निवासी नायब तहसीलदार पंडित पाटील, संजय गांधी विभागाच्या नायब तहसीलदार शोभा भालेकर, उपविभागीय पोलीस अधिकारी विजय पाटील, पोलीस निरीक्षक अविनाश कवठेकर, सातारा जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विक्रमबाबा पाटणकर यांच्यासह माजी सैनिक, वीरपत्नी, वीरमाता व मान्यवर उपस्थित होते.

भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त तालुक्यात भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. तालुक्यात हर घर तिरंगा या उपक्रमासही नागरिकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत प्रत्येक घराघरावर तिरंगा झेंडा फडकवला होता. शासकीय पातळीवरील सर्वच कार्यालयांसह खाजगी कार्यालये, सामाजिक संस्था, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक विभागामार्फतही भरगच्च कार्यक्रम आयोजित केले होते. स्वातंत्र्य दिनानिमित्ताने पाटण शहरातील विविध शाळांनी प्रभातफेरींचे आयोजन केले होते. ध्वजारोहणानंतर तहसील कार्यालयाच्या प्रतीक्षालयात मान्यवरांच्या हस्ते माजी सैनिक, वीरपत्नी, वीरमाता यांचा सत्कार करण्यात आला.




तहसील कार्यालयात ध्वजारोहणप्रसंगी सोपान टोम्पे, समवेत अनंत गुरव आदी. (नितीन खैरमोडे)

पाटण अर्बन बँकेत चेअरमन जयसिंग उर्फ बाळासाहेब राजेमहाडिक, पाटण तालुका दूध संघात चेअरमन सुभाषराव पवार यांच्या हस्ते, पाटण पोलीस स्टेशनमध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी विजय पाटील, पंचायत समितीच्या आवारात गटविकास अधिकारी सविता पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. पाटण तालुका खरेदी- विक्री संघात चेअरमन अॅड. अविनाश जानुगडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. पाटण नगरपंचायतीमध्ये नगराध्यक्षा सौ.अनिता देवकांत यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. तदनंतर माजी सैनिकांचा वृक्ष देवून सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी सर्वांना नशामुक्तीची शपथ देण्यात आली. यावेळी उपनगराध्यक्ष यांच्यासह सर्व नगरसेवक, नगरसेविका, पाटण शहरातील प्रतिष्ठित नागरिक, महिला उपस्थित होत्या. बाळासाहेब देसाई महाविद्यालयात प्राचार्य डॉ. शिरीष पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी तालुक्यातील वीर माता, माजी सैनिक यांचा सत्कार करण्यात आला.

लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखानास्थळावर चेअरमन यशराज देसाई यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी व्हाईस चेअरमन पांडुरंग नलवडे, संचालक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. शिवदौलत सहकारी बँकेचे ध्वजारोहण बँकेचे अध्यक्ष संजय देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बँकेचे सर्व संचालक,अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. लोकनेते बाळासाहेब देसाई शताब्दी स्मारकावर शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. पाटण शहरातील सर्व विद्यालय, महाविद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खाजगी शाळा, बँका, पतसंस्था, ग्रामपंचायती, सोसायट्यांमध्ये विविध उपक्रमांनी स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर पाटण शहरातून विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी रॅली काढली होती.